प्रेस नोट दिनांक :— २२/११/२०२५

यातील तक्रारदार यांचा रबाळे पोलीस स्टेशन येथे असलेला तक्रारी अर्ज आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार, बं. नं. ०५ श्री भाऊसाहेब शिंदे, रबाळे पोलीस स्टेशन यांनी त्यांचे मर्जीतील अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज चौकशी करीता देवुन तक्रादार यांचे अर्जावर त्वरीत कार्यवाही करुन देत असल्याचे भासवुन तसे अमिष दाखवुन त्या करीता तक्रारदार यांचेकडुन लाचेची मागणी करून सदरची लाचेची रक्कम एका खाजगी इसमाचे मोबाईलवर ऑनलाईन पाठविण्यास सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवक यांचे सांगणेनुसार ऑनलाईन पैसे पाठविले. बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ठाणे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव | **आरोपी लोकसेवक श्री भाऊसाहेब पांडुरंग शिंदे, पोलीस नाईक, बक्कल नंबर ०५, नेम. रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय. (वर्ग—३)** |
| मागितलेली लाचेची रक्कम | **रुपये ५०००/—** नमुद लाचेची मागणी करुन रबाळे रेल्वे स्टेशनचे वाहन पार्कींग मधील एका खाजगी इसमाचे मोबाईलवर तक्रारदार यांना ऑनलाईन ५०००/—रु रक्कम पाठविण्यास सांगीतली त्यानुसार तक्रारदार यांनी ५०००/—रु रबाळे रेल्वे स्टेशनचे वाहन पार्कींगमधील एका खाजगी इसमाचे मोबाईलवर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन युपीआय आयडी व्दारे स्कॅन क़रुन पाठविले. सदर इसमाचे ऑनलाईन पाठविलेले युपीआय ट्रान्झाक्शन आयडीवरील नाव ' **हवालदार सिंग देविप्रसाद सिंग** ' असे आहे. |
| स्विकारली लाचेची रक्कम | — |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांचे '' आई एकविरा अपर्मिंट '' या सोसायटीचे/इमारतीचे विकासक मे. तुषार इंटरप्रायजेस तर्फे श्री तुषार रमेश ठाकुर एजंट संतोष तुकाराम जाधव (राजु) यांनी फसवणुक केल्याबाबत तक्रारदार यांनी सोसायटीचे अध्यक्ष या नात्याने दि. १२/११/२०२५ रोजी रबाळे पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारी अर्जा दिला आहे. सदर अर्जावर कारवाई करण्याकरीता पोहवा/शिंदे यांनी त्यांचे मर्जीतील अधिकारी यांचेकडे सदर अर्ज चौकशी करीता देवुन त्यावर कारवाई करण्याचे आमिष दाखवुन तक्रारदार यांचेकडुन २०,०००/—रुपयांची मागणी करत असलेबाबत दिनांक २०/११/२०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रारी दिली.<br><br>सदर तक्रारी वरुन दि. २०/११/२०२५ रोजी पंच साक्षिदारांसमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक श्री. **भाऊसाहेब पांडुरंग शिंदे, पोलीस नाईक, बक्कल नंबर ०५ नेम. रबाळे पोलीस स्टेशन** यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/—रुपये ( पाच हजार रुपये ) लाच म्हणून मागणी करुन ते रबाळे रेल्वे स्टेशन जवळच्या खाजगी वाहन पार्कींगचे काम करणा—या एका खाजगी इसमाचे मोबाईलवर तक्रारदार यांना ऑनलाईन पाठविण्यास सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन नमुद रबाळे रेल्वे स्टेशनचे पार्कींगवाला ( तक्रारदार यांनी पाच हजार ऑनलाईन पाठविलेले युपीआय ट्रान्झाक्शन आयडीवरील नाव ' **हवालदार सिंग देविप्रसाद सिंग** ' नामे ) यांचे मोबाईलवर ५,०००/—रु पाठविले. त्यानुसार नमुद पार्कींगवाला खाजगी इसम यांचेकडुन लोकसेवक शिंदे यांनी २०००/— रु रोख रक्कम घेवुन उर्वरीत रक्कम दुस—या दिवशी देण्याबाबत सांगीतल्याचे निष्पन्न झाल्याने **लोकसेवक भाऊसाहेब पांडुरंग शिंदे, पोलीस नाईक, बक्कल नंबर ०५, नेम. रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय** यांचेविरुध्द भ्रष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७, १२ प्रमाणे सरकारतर्फे आम्ही कायदेशिर फिर्यादीवरुन दिनांक २२/११/२०२५ रोजी ०६:३९ गुन्हा |

| | |
|---|---|
| | दाखल करण्यात आलेला आहे.<br>सदरचा गुन्हा पुढील तपास करीता श्री विजय कावळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे. यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी— मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा. श्री. भागवत सोनवणे , अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा. श्री. सुहास शिंदे , अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

———————————————————————————————————————

संपर्क पत्ता :— लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :—acbmaharastra@mahapolice.gov.in
ईमेल—spacbthane@mahapolice. Gov.in
अॅप्लीकेशन —acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर —१०६४, दुरध्वनी क्रमांक —०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
**व्हॉटस्अॅप् क्रमांक —९७६९६९१०६४**
**दिनांक :— २२/११/२०२५**

पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे

**( रुपाली पोळ )**
**पोलीस निरीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे.**